साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## बीड मधील सर्व मल्टीस्टेट सहकारी क्रेडीट सोसायटीच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करून अहवाल सादर करावा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (बातमदार):- ठेवीदारांना न्याय देण्यासाठी बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित आरोपींवर तत्काळ कारवाई करावी. तसेच सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करण्याचे, निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

ज्ञानराधा मलटीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी ने मुदत ठेव, बचत ठेव, चक्रवर्ती ठेवींवर १० ते १८ टक्के व्याजदराचे आकर्षण ठेव योजनांचे आमिष दाखवून ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संबंधित पोलीस, विशेष तपास यंत्रणांना गतीने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पणन मंत्री जयकुमार रावल, मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार प्रकाश



सोळंके, अर्जुन खोतकर, सुरेश धस, संतोष दानवे, सुभाष देशमुख, विजयसिंह पंडित, रत्नाकर गंगारवेड, अपर पोलीस अधीक्षक किरण पाटील, उपअधिक्षक शशिकांत सावंत, अतिरिक्त मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, प्रधान सचिव सहकार व पणन, सहकार आयुक्त उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अनेक सामान्य आणि गोरगरीब ठेवीदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, संबंधित १९ आरोपींवर तातडीने कारवाई करण्यात यावी. बहुराज्य सहकारी संस्था नियंत्रक विभागामार्फत सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करा, त्यासाठी विशेष मोहीम राबवावी. बीड जिल्ह्यातील सर्व मल्टीस्टेट सोसायट्यांच्या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी एकत्रित बैठक घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा. फसवणूक झालेल्या ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी ही कारवाई आवश्यक असून, या प्रकरणांमध्ये कठोर आणि वेळेत निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले. ***

## आ.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय क्रीडा व सांस्कृतिक सप्ताहाचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आ.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी नाथ शिक्षण संस्थे अंतर्गत शालेय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नाथ शिक्षण संस्थेच्या सचिव सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे व सहसचिव मा.श्री.प्रदीपजी खाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५/०७/ २०२५ ते २२/०७/२०२५ पर्यंत नाथ शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असलेल्या विद्यालय व महाविद्यालयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा व सांस्कृतिक प्रमुख यांच्या बैठकीत प्रथमोपचार मार्गदर्शन, पोलीस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन,शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून वाढदिवस सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती नाथ शिक्षण संस्थेचे समन्वयक प्राचार्य अतुल दुबे, प्राचार्य व्हि.एन.शिंदे , आर.बी.गुट्टे, मुख्याध्यापक श्री. कदरकर, श्री.साखरे, श्रीमती वानखेडे मॅडम, श्री.राठोड, श्री.आघाव, श्रीमती धस मॅडम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिले आहे. ***

## उड्डाणपुलावरील वाहतूक होणार बंद

परळी वैजनाथ, (बातमीदार):- गेल्या अनेक दिवसापासून चर्चेत असलेल्या परळी येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरूस्तीच्या कामाला मंगळवार (दि.१५) पासून सुरूवात होणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूरचे उपविभागीय अभियंता एस.एम.उरगुंडे यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत. ५ ऑगस्ट पर्यंत हे काम चालणार असून त्यामुळे बायपास रस्त्यावरून वाहतूक करावी लागणार आहे. या पुलाच्या बेअरिंग बदलण्याचे काम नव्वद टक्के झाले आहे. उर्वरित दहा टक्के काम करण्यासाठी तसेच एक्सपेन्शन जॉईट रिप्लेसमेन्टचे काम करण्यासाठी पुलावरील वाहतूक बंद ठेवावी लागणार आहे. दुरूस्तीच्या कामास अडथळा येवू नये म्हणून तसेच अपघाताचा धोका टाळण्यासाठी पुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. ***



# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व आ.धनंजय मुंडे यांचा वाढदिवस: मंगळवारपासून परळीत सेवा संकल्प सप्ताह

## मोठ्या संख्येने सहभागी व्हा- बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी










परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस परळीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचा सेवा संकल्प सप्ताह १५ ते २२ जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रा.काँ. तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके व शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी केले आहे.

१५ जुलै २०२५ रोजी सकाळी ६ वा. योगासन स्पर्धा, सकाळी १०:०० वा सेवा संकल्प सप्ताह उदघाटन व धनंजय मुंडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा सकाळी ११ वा. मृदंग स्पर्धा,,सायं ७:०० ते १०:०० वा .भावरत्न गुरुदास ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन १६ जुलै २०२५ रोजीयुवा पिढीसाठी सामाजिक भान जपणारे मनोरंजनात्मक व्यासपीठ-रिल्स स्पर्धा ,१७ जुलै २०२५: महिलांसाठी भजन स्पर्धा १८ जुलै २०२५:शालेय सांस्कृतिक महोत्सव (शहर)१९ जुलै २०२५:शालेय सांस्कृतिक महोत्सव (ग्रामीण) विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी.२० जुलै २०२५; आरोग्य शिबीर सर्वांसाठी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन२१ जुलै २०२५ सामान्य ज्ञान ,२२ जुलै २०२५ ना. अजितदादा पवार यांचा अभिष्टचिंतन (सकाळी १०:३० वा.) परळी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, शालेय साहित्य वाटप व बक्षिस वितरण सोहळा होणार आहे . तसेच प्रसिद्ध व्याख्याते महेश पाटील सर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे.

तसेच या सेवा संकल्प सप्ताहात ८ दिवस, दररोज विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्येआरोग्य तपासणी,मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबीर, एपीएल फॉर्मस् डीबीटी योजना व शिधापत्रिका ऑनलाइन करुन देणे, घरकुल व विविध शासकीय योजना तक्रार निवारण,पर्यावरण संवर्धनासाठी एक अनोखा उपक्रम प्रत्येक नागरिकाला एक वृक्ष भेट!आधार कार्ड दाखवा व वृक्ष घेऊन जा उपक्रम,संजय गांधी निराधार योजना लाभार्थी यांचे आधार सिडीग, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी, डोमिसाईल आदी कागदपत्र एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी विद्यार्थी विविध प्रमाणपत्र कॅम्प,बांधकाम कामगार नोंदणी अभियान: नवीन नोंदणी व नूतनीकरणासाठी विशेष सोय,पक्षाशी जोडून घेण्यासाठी सुवर्णसंधी: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदस्य नोंदणी अभियान आदी कार्यक्रम, उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे सर्व कार्यक्रम व उपक्रम होणार आहेत. या सेवा संकल्प सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच या सेवा उपक्रमांचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके व शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी व सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस परळी वैजनाथ यांनी केले आहे. ***

# आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मोफत कृत्रिम हात, पाय वाटप शिबिराचा लाभ घ्यावा-डॉ. संतोष मुंडे

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मा.आ.धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त डॉ. संतोष मुंडे यांच्या श्रीनाथ हॉस्पिटल परळी वैजनाथ येथे भव्य मोफत कृत्रिम हात, मॉड्युलर पाय ,कुबड्या व कॅलिपर्स वाटप शिबिराचे आयोजन दिनांक १५ जुलै मंगळवार रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले आहे.

मा आ.धनंजयजी मुंडे यांच्या मार्गदर्शनातून रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व धनंजयजी मुंडे आरोग्य मित्र योजना तसेच दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती या शिबिराचे मुख्य आयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष तथा धनंजय मुंडे आरोग्य मित्र योजनचे अध्यक्ष डॉ. संतोषजी मुंडे यांनी दिली.



दिव्यांगाचे कैवारी म्हणून ओळख असणारे तसेच विविध सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर राहून विविध आरोग्य शिबिरे व दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबवणारे त्याचबरोबर प्रसंगी दिव्यांगाच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष तथा धनंजय मुंडे आरोग्य मित्र योजनेचे अध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या अथक प्रयत्नातून या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे ज्यामुळे दिव्यांगांच्या जीवनात एक भव्य आनंदाचा प्रकाश झोत येणार आहे.

या शिबिरांतर्गत ज्या दिव्यांगांना हात किंवा पाय नाही त्याचबरोबर जो दिव्यांग अपघातामध्ये आपला हात किंवा पाय हरवून बसला आहे अशा सर्व दिव्यांग नागरिकांसाठी कृत्रिम हात व मॉड्युलर पाय तसेच कुबड्या ,कॅलिपर्स मोफत वाटप होणार आहेत. दरम्यान ज्या दिव्यांग नागरिकांचे या आधी झालेल्या मोजमाप शिबिरामध्ये मोजमाप झालेले आहे त्यांनाच हे मोफत हात, मॉड्युलर पाय कुबड्या कॅलिपर्स यांचा लाभ होणार आहे अशीही माहिती देण्यात आलेली आहे. तरी परिसरातील दिव्यांगांनी बांधवांनी आज होणाऱ्या या भव्य मोफत शिबिरासाठी श्रीनाथ हॉस्पिटल परळी वैजनाथ येथे सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान या शिबिराचे मुख्य आयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी केले आहे. ***

# सोलापूरच्या क्रिकेट स्पर्धेत गौरव गादेकर ठरला सर्वोत्कृष्ट खेळाडू

परळी वैजनाथ, (बातमीदार):- सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार येथील गौरव प्रमोद गादेकर यास मिळाला आहे.

सोलापूर येथील भंडारी मैदानावर या स्पर्धा घेण्यात आल्या. कै.जे.टी.कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामना सोलापूरच्या भंडारी स्पोर्ट अकॅडमी व बार्शी येथील एचपीसीसी क्रिकेट संघात झाला. सोलापूरच्या संघाचा ८४ धावांनी पराभव झाला. विजेतेपद बार्शी येथील एचपीसीसी संघाला मिळाले. एचपीसीसी संघाने प्रथम फलंदाजी करत ४० षटकात नऊ बाद १७४ धावा केल्या होत्या तर भंडारी क्रिकेट अकॅडमीला सर्व बाद ९० धावा पर्यंतच मजल मारता आली. ८४ धावांनी बार्शीच्या संघाने जिंकला. अंतिम सामन्यात सर्वोत्कृष्ट खेळाळूचा पुरस्कार बार्शीच्या एचपीसीसी संघाकडून खेळणाऱ्या गौरव प्रमोद गादेकर यास



मिळाला. स्पर्धेचे बक्षीस वितरण ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी यांच्यासह उद्योजक युवराज मुटकुळे, जितेश कुलकर्णी, चंद्रकांत रेम्बर्सू, संतोष बडवे, सुनील मालप, शिवानंद आकलुजकर, राजेंद्र गोटे, विक्रांत पवार, एचपीसीसी संघाचे व्यवस्थापक आनंद शेलार, राजू रंगम, किरण डिगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. गौरवच्या या यशाबद्दल त्याचे संघातील खेळाडू व मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे. ***

# श्री १०८ गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे १६ वे २१ दिवस मौन अनुष्टान परळीत विविध समित्यांची स्थापना

परळी वैजनाथ (बातमीदार):- लातूर जिल्ह्यातील खरोळा (ता.शिरुर अनंतपाळ येथील श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज मठ संस्थान येथील श्री १०८ गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे १६ वे २१ दिवस मौन अनुष्टान येथील श्री गुरुलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे २६ जुलै ते १६ ऑगस्ट दरम्यान संपन्न होणार आहे. यासंदर्भात रविवारी (दि.१३) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. येथील श्री गुरुलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे आयोजित विरशैव समाजाच्या बैठकीत २६ जुलै ते १६ ऑगस्ट दरम्यान संपन्न होणाऱ्या श्री १०८ गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या १६ व्या २१ दिवस मौन अनुष्टान संदर्भात चर्चा करण्यात आली. या अनुष्टांनाच्या नियोजनासाठी समिती स्थापन करण्यात आली असून या समितीच्या अध्यक्षपदी दयानंद चौधरी, उपाध्यक्षपदी सौ.सुरेखा मेनकुदळे, श्रीमती प्रेमला वेरुळे, सचिन स्वामी, शिवकुमार चौंडे, सचिवपदी सुशील हरंगुळे, नितीन समशेट्टे, सहसचिव चंद्रकांत उदगीरकर, दत्तात्रय गोपनपाळे, कोषाध्यक्ष सोमनाथ गोपनपाळे, सह कोषाध्यक्ष प्रकाश खोत, सदस्यपदी रमेश आप्पा सपाटे, गिरीश संकाये, कैलास रिकिबे, नरहरी आप्पा टेकाळे, गौरीशंकर मोदी, रोहित नरेश हालगे, मिरवणूक समितीपदी महादेव ईटके, विकास हालगे, राजेश्वर तिळकरी, रमेश चौंडे, अश्विन मोगरकर, संजय कोरे यांची निवड सर्वसंमतीने करण्यात आली. यावेळी बैठकीस संत गुरुलिंग स्वामी मंदिर बेलवाडीचे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके गुरुजी, श्री वैद्यनाथ मंदिराचे विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, भाजपच्या शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, वक्रेश्वर मंदिराचे विश्वस्त सुभाष आप्पा भिंगोरे, नारायण आप्पा खके श्याम बुद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीस राजाभाऊ नरवणे, नाईकवाडे आप्पा, सोमेश्वर ब्याळे, शिवलिंग कोद्रे, अशोक झाडे कपील चौधरी, वैजनाथ आल्दे, रमाकांत गुजर, रवि बुरकुले, वैजनाथ चौधरी, संदिप चौधरी, नंदकुमार शेटे, रमाताई आल्दे, श्रीमती आशा हरंगुळे, भागिरथी मार्गे, कमलबाई घेणारे, कलावतीबाई खरबड, श्री सुनंदा पंचाक्षरी, श्रीमती श्रीदेवी हालगे, निर्मलाताई पुसकर, श्रीमती मंगला गुळवे, शैलजा स्वामी, श्रीमती सुवर्णा मोगरकर, मंगला वेरुळे, सौ मंगलाताई देशमाने आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्री १०८ गुरु शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या अनुष्ठान निमित्त शोभायात्रा व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत सर्व विरशैव समाजबांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. ****

# पावसाने दडी मारल्यामुळे परळी तालुक्यातील शेतकरी हवालदिल

परळी वैजनाथ, (बातमीदार):- पावसाने दडी मारल्यामुळे परळी तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले असून अद्यापही तीस टक्के खरीपाच्या पेरण्या न झाल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे.जूनच्या प्रारंभीपासून परळी तालुक्यात पावसाने पाठ फिरवली आहे. मे महिना व जूनच्या प्रारंभीपर्यंत झालेल्या पावसावर सुमारे साठ ते सत्तर टक्के शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरणीचे काम पूर्ण केले होते. पावसाने उघडीप दिल्याने तीस टक्क्यावर शेतकऱ्यांच्या पेरण्या होऊ शकल्या नाहीत. गेल्या सव्वा महिन्यांपासून पाऊस नसल्याने तालुका दुष्काळाच्या उंबरठ्यावर येवून ठेपला आहे. पेरणी झालेल्या पीकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पीके पावसाअभावी सुकत चालली आहेत. त्यामुळे शेतकरी मोठ्या चिंतेत आहे. येत्या काही दिवसात पाउस न झाल्यास तालुक्यात गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे. ***

संपादकीय...

# ठोस उपाय योजना हवी..!

*** सुविचार *** झालेल्या चुकांवर भर देऊन एकमेकांना दोष देऊन निराशामय वातावरण तयार करण्यापेक्षा झालेल्या चुकांमधून बोध घेऊन मार्गात योग्य बदल करून आशादायी वातावरण तयार करणे कधीही चांगले असते..!

आकरा जुलै हा दिवस दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने राज्य व केंद्र सरकारकडून विविध जनजागृतीचे कार्यक्रम घेतले जातात. परंतु दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकसंख्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना मात्र केल्या जात नाहीत. त्यामुळे वाढती लोकसंख्या रोखण्यात सरकारला अपयश येत आहे. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लोकसंख्येने आपल्यालाच नाही तर सबंध जगाला चिंतेत टाकले. लोकसंख्या अशीच वाढत राहिल्यास जगापुढे विविध प्रश्न व समस्यांचे मोठे आव्हान उभे राहणार आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा भारताची लोकसंख्या चौतीस कोटीच्या आसपास होती, असे सांगितले जाते. गेल्या पाऊणशे वर्षात या लोकसंख्येत चौपट-पाचपट वाढ झाली आहे. आपल्या शेजारी असलेल्या व क्षेत्रफळाने भारतापेक्षाही मोठ्या असलेल्या चीनची लोकसंख्या जगात सर्वाधिक होती. परंतु लोकसंख्येच्या वाढीबाबत आता चीनलाही भारताने मागे टाकले आहे. आज भारताची लोकसंख्या जगात सर्वाधिक झाली आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या जागतिक लोकसंख्येच्या अहवालानुसार गेल्या एप्रिल २०२३ मध्ये लोकसंख्येबाबत भारताने चीनला मागे टाकले. त्यावेळी भारताची लोकसंख्या एक हजार चारशे ३८ दशलक्ष एवढी झाली. आज म्हणजे २०२५ ला ही लोकसंख्या एक हजार चारशे ६४ दशलक्ष एवढी झाली आहे तर चीनची लोकसंख्या एक हजार चारशे १६ दशलक्ष एवढी आहे. लोकसंख्येच्या वाढीची गती अशीच राहिली तर येत्या दोन-तीन वर्षात भारत दीडशे कोटीचा टप्पा ओलांडेल असे चित्र आहे. दोन हजार ३० पर्यंत जगाची लोकसंख्या साडेआठशे कोटी होईल त्यात भारताची दीडशे व त्या खालोखाल चीनची अशी मिळून तीनशे कोटी लोकसंख्या या दोन देशाची असेल. उर्वरित साडेपाचशे कोटी जगातील इतर सर्व देशाची मिळून असेल.

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे जगासमोर आज अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. परवाच प्रसिद्ध झालेल्या एका आकडेवारीनुसार जगाची दररोज इंधन तेलाची भूक १०.५ कोटी बॅरलवर गेली आहे. पुढील वर्षी ती १०.२६ कोटी बॅरलपर्यंत जाणार असल्याचा निष्कर्ष 'ओपेक प्लस' देशाच्या पाहणी अहवालात देण्यात आला आहे. नुसत्या तेलाची ही परिस्थिती आहे तर मग एवढ्या लोकसंख्येला जगवण्यासाठी अन्न, पाणी, राहण्यासाठी घर याची स्थिती कशी असेल हा प्रश्न पडतो. जागतिक तापमान वाढीमुळे हवामानावर गंभीर परिणाम होतो आहे. त्यामुळे ऋतूचक्राचा समतोल बिघडला आहे. परिणामी आपल्याकडे शेती व शेतकरी उध्वस्त होतो आहे. दिवसेंदिवस कमी होणाऱ्या शेतजमिनीवर ताण येतो आहे. झटपट अधिकाधिक उत्पन्न घेण्यावर भर दिला जात आहे. यासाठी रासायनिक खतांचा मारा मोठ्या प्रमाणात होतो आहे. याचा परिणाम शेतजमिनीला खताची सवय लागून जमिनी प्रदूषित झाल्या आहेत. त्यांची नापिकीकडे वाटचाल सुरू झाली आहे. यामुळे भविष्यात अन्नाची कमतरता भासुन मोठे संकट येण्यची भीती आहे. वाढत्या शहरीकरणामुळे शेतजमिनी कमी होत चालल्या आहेत. याचा मोठा धोका शेतीच्या उत्पन्नावर होणार आहे. छोट्या-मोठ्या गावांचे आता शहरं झाली आहेत. महानगरे तर लोकसंख्येने खचाखच भरली आहेत. रहायला जागा, खायला अन्न मिळवण्यासाठी महानगरात मोठे पैसे मोजावे लागत आहेत. शिक्षण आरोग्य, प्रदुषण, नागरी सुविधा, पिण्याचे पाणी, कचरा, वीज, दुषित पाणी, गटारे अशा कितीतरी गोष्टींची गंभीर समस्या शहरी भागात 'आ' वासून उभी आहे. यावर शेकडो कोटी रूपये खर्च होतो आहे. अनेक सरकारी योजनांचा लाभ वाढत्या लोकसंख्येमुळे शेवटच्या माणसांपर्यंत जाणे आज आवघड होऊन बसले आहे. एकुणच सरकारी योजना व पायाभूत सुविधांचा बोजवारा उडत चालला आहे. ही परिस्थिती अशीच सुरू राहिली तर मोठे आव्हान आपल्यासमोर असणार आहे. लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी गेल्या अनेक दशकापासून सरकारी पातळीवर प्रयत्न केले जातात. 'हम दो हमारे दो', पुरूष नसबंदी, कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया असे उपक्रम तसेच सरकारी नोकऱ्या, शासकीय योजनांचे लाभ याबाबत कात्री लावली जात आहे. परंतु त्यास मर्यादा पडते आहे. भविष्यात शुद्ध हवा, पिण्याचे पाणी, रहायला घर आणि खायला अन्न यासाठी मानवाला मोठा संघर्ष करावा लागेल असे चित्र आहे. जगासमोर येऊ घातलेले हे मोठे संकट रोखायचे असेल तर लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी ठोस प्रयत्न होणे गरजेचे आहे. सरकार बरोबर समाजातील सर्व घटकांनी यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी कडक कायद्याची व त्याच्या प्रभावी अंमलबजावणी आवश्यकता आहे. ***

# मैं बीज हुँ, आदत है मेरी, बार बार उग जाने की!

कवितेच्या ओळी अनुषंगिक वाटत असल्या तरी त्या तंतोतंत लागू पडणाऱ्या आहेत. त्याचं कारण असं आहे की, धनंजय मुंडे हे नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न होण्याची ही काही पहिली वेळ नाही! तसं यावेळी जरा अतीच झालं म्हणावं लागेल मात्र अशा प्रकारचे आघात हे या व्यक्तीसाठी काही नवीन नाहीत.

आयुष्यात लढविलेली पहिली जिल्हा परिषद निवडणूक ही त्या सुप्त संघर्षाची सुरुवात होती, सोप्या आणि जवळच्या जागा सोडून त्या काळी म्हणजे २००२ साली बीड जिल्ह्याची गडचिरोली म्हणवल्या जाणाऱ्या पट्टीवडगाव सर्कल मधून लढावे लागले. कदाचित संघर्ष हा यांच्या पाचवीला पुजलेला असावा, त्यामुळे आजवर जे मिळाले त्यातले सहज हाती लागले असे काहीच नाही.

कधी नियतीने तर कधी व्यक्ती द्वेषाने धनंजय मुंडे यांना अनेक हल्ले सहन करून प्रतिहल्ला न करता संयमाने परतवून लावावे लागले; याची शेकड्याने उदाहरणे देता येतील. पण त्या प्रत्येक आघातातून कुणालाही न दुखावता किंवा फारसे डॅमेज न होऊ देता अत्यंत धीरोदात्त पणे लढून धनंजय मुंडे इथपर्यंत पोचले. त्यात सगळ्यात मोठा वाटा प्रभू वैद्यनाथ नगरी अर्थात परळीतील जनतेचा आहे. आजवर परळीची ही माय बाप जनता प्रत्येक वेळी, प्रत्येक संघर्षात धनंजय नावाभोवती एक अभेद्य तटबंदी बनून उभी राहिली आहे.



म्हणूनच नेहमी म्हटले जाते की एखादे नेतृत्व घडायला अनेक दशके लागतात, अनेक प्रकारचा त्याग, बलिदान, उपासना आणि संघर्ष त्यामागे दडलेला असतो. ज्याने या सर्व गोष्टी सहन केल्यात त्याला संपवण्याची सुपारी तितकी सोपी नाही!

लोकसभा निवडणुकीतील धनंजय मुंडे यांचे समर्पण सर्वांनी डोळ्यांनी पाहिले. निसटता पराभव झाला तो स्वीकारून पुन्हा ते कामाला लागले. विधानसभा निवडणुकीत इतर मतदारसंघात ३२ पेक्षा अधिक सभा घेतल्या. इतकेच नाही तर स्वतः उमेदवार असून सुध्दा अगदी मतदानाच्या आदल्या रात्री अगदी पहाटेच्या दोन वाजेपर्यंत आपल्या गेवराई च्या बंधूंच्या प्रचारार्थ बैठका घेत होते. परळीच्या अभेद्य किल्ल्याने धनंजय मुंडे या नावाभोवती महाराष्ट्रातील क्रमांक दोनची लीड उभी केली. त्यादिवशी अनेकांनी बांगड्या फोडल्या... अनेक आरोप केले त्या सर्वांच्या तोंडावर स्वतः निवडणूक आयोगाने क्लीनचीट चिटकवली, तरीही बदनामी सुरूच! पण खवळलेला विरोध आणि संपवायची सुपारी परळी पासून शेकडो किलोमीटर वरती शिजत होती; त्यांना हवी होती फक्त एक संधी! जिल्ह्यात घडलेल्या एका दुर्दैवी घटनेच्या आडून अशी काही संधी साधवून घेतली की.... बापरे! १६५ दिवस एका सर्वसामान्य नेतृत्वाला संपवण्यासाठी मीडिया ट्रायल? देशात कधी आजवर झाली नसेल; किती मोठमोठे आहेर कुणाकुणाला देण्यात आले, याची अनेकांना कल्पना आहे. खाजगीत विरोधक सुध्दा आता ते बोलून दाखवतात. किंबहुना आता सर्वसामान्य जनतेला सुध्दा ते कळून चुकलं आहे.

**– सुधीर सांगळे, बीड**

जातीयवादाचा ठपका ठेवून बदनामी, घोटाळ्यांचे आरोप ध चा म करून बातम्यांची पेरणी तर इतकी की अगदी पिंपळाचे पान गळाले अशी वस्तुस्थिती असताना धनंजय मुंडे यांच्या मुळे पिंपळगाव जळले, अशा बातम्या दाखवून त्यावर डिबेट घडवून आणल्या गेल्या... अगदी, आई, भाऊ, मुली - बाळी यांच्या पर्यंत बदनामी? कशासाठी? उत्तर आहे केवळ सुपारी! या व्यक्तीला राजकारणातून संपवायचे याची सुपारी!

धनंजय मुंडे या माणसाला मुळात कधी जात शिवलेली नाही, महापुरुषांच्या जयंती मध्ये भाषणे करताना ते आवर्जून सांगतात की महापुरुषांच्या कार्याचा आदर्श घ्या, त्यांना जातीत वाटून घेऊ नका. इतकेच काय तर राजकारणात संधी देताना सोशल इंजिनिअरिंग साधावी ती धनंजय मुंडे यांनीच! त्याचीही शेकडो उदाहरणे सांगता येतील. पण नाव सांगितले की त्याची जात शोधायची ही पद्धत सध्या सुरू आहे, त्यामुळे नाव टाळलेले बरे. विरोधीपक्षनेते, आमदार, मंत्री अशा विविध पदांवर काम करताना, त्यांच्या सभोवती सर्वाधिक अधिकारी कर्मचारी हे मराठा समाजाचे राहिले आहेत. त्यामुळे जातीचे लेबल लावून त्यांची बदनामी करणे म्हणजे अत्यंत ''छोटी सोच'' ठरेल.

मीडिया ट्रायल, व्यक्तिगत आरोप, बदनामी हे सगळे इतक्या टोकाला पोचवले गेले की त्यांचा परिणाम स्वतःच्या तब्येतीवर सुध्दा झाला. ज्या माणसाच्या जिभेवर माता सरस्वती वास करते, त्या व्यक्तीला एका आजारामुळे जवळ जवळ तीन महिने बोलता येईना, सतत माणसात राहणे, बोलणे, भाषणे, संवाद अशी आयुष्याची शिदोरी असलेल्या व्यक्तीला तीन महिने बोलता येत नाही, तेव्हा त्यांच्या मनाला त्याच्या किती वेदना होत असतील? पण दुसरीकडे राजीनामा आणि दीर्घकाळ मुंडेंचे मौन याचा अर्थ सुपारी बहाद्दर गँग ने काढला की आता धनंजय मुंडे संपले!

राज्यात स्वकर्तृत्वावर मोठे झालेले व आपल्या पक्षासह मित्रपक्षात देखील तितकेच वजन असणारे धनंजय मुंडे हे नाव गप्प बसणाऱ्या किंवा सहज सर्वकाही मागे सोडून देणाऱ्यापैकी नाही. याची प्रचिती आगामी निवडणुकांच्या काळात येईलच! निष्ठावंत कार्यकर्त्यांची मजबूत फळी, बेरजेचे राजकारण, मोकळे व मोठे मन

(उर्वरीत पान ३ वर)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशु प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०९ * अंक १० * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ * किंमत : २ रु.

# परळी औ.वि.केंद्रातील बंद संचांच्या जागेत उभारणार सौर ऊर्जा प्रकल्प

## आ.धनंजय मुंडे यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली विधानसभेत घोषणा

मुंबई (बातमीदार):- विधानसभेत आ.धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेल्या एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी वैद्यनाथ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्याचे घोषित केले आहे. त्याचबरोबर याच औष्णिक विद्युत केंद्रात शिल्लक असलेल्या जागेत नवीन नवव्या संचाची उभारणी करण्याबाबत काही तांत्रिक अडचणी आहेत, त्यावर आज चर्चा झाली असली तरी या संदर्भात एक व्यापक बैठक घेऊन सकारात्मक मार्ग काढू, असे आश्वासनही श्री फडणवीस यांनी दिले आहे.

परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्रात निष्कासित करण्यात आलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेवर अधिक क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारून त्याद्वारे हरित ऊर्जा निर्मिती केली जावी, त्याचबरोबर संच क्रमांक ८ च्या तुलनेत अधिक वीज निर्मिती क्षमता असलेला संच क्रमांक ९ नव्याने उभारण्यात यावा अशी मागणी आज तारांकित प्रश्नाव्दारे उपस्थित केली, त्यास श्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिले. नवव्या संचाची उभारणी करण्याबाबत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार शासनाने विचार केला असता, विजेची मागणी, कोळसा खरेदी मधील भावाची तफावत, कोळसा वाहतुकीस लागणारा खर्च आदी तांत्रिक अडचणी असल्याचे श्री फडणवीस यांनी नमूद केले. त्यावरून धनंजय मुंडे यांनी प्रचलित पद्धतीने कोळसा खरेदी करणे ऐवजी वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड किंवा महानंदी कोलफिल्ड लिमिटेड यांच्याकडून तोच कोळसा कमी दरात उपलब्ध केला जाऊ शकतो, शिवाय आवश्यक जमीन, पाणी आदी सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असून, याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, याकडे सभागृहाचे लक्ष वेधले.

यावेळी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौर ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीला मान्यता देत असल्याचे सांगत नवीन नवव्या संचाची उभारणी करणे संदर्भात एक व्यापक बैठक घेऊन त्यात सर्व मुद्दे व तांत्रिक बाबींचा अभ्यास करून, योग्य सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले आहे. **सहा महिन्यांनंतर धनंजय मुंडे सभागृहात बोलले; अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणी!** दरम्यान महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर सुमारे सहा महिन्यानंतर धनंजय मुंडे यांनी आज सभागृहात प्रथमच तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून भाषण केले; अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी, संयमी पण प्रखर बोलणे, मुद्याशी खिळून राहणे व ठेवणे, सभागृहाचा डेकोरम सांभाळणे या सर्वच बाबींची काळजी घेऊन सभागृह गाजविणारे धनंजय मुंडे आज पुन्हा एकदा पाहायला मिळाले! ***

# २६ ऑगस्टपासून धावणार मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेस

मुंबई :- मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी समोर येत आहे. ही बातमी परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील प्रवाशांसाठी अधिक खास ठरणार आहे कारण की मुंबई ते नांदेड वंदे भारत ट्रेन कधी सुरू होणार? याबाबत खासदार अशोक चव्हाण यांनी मोठी माहिती दिली आहे.

महाराष्ट्रातील वंदे भारत एक्सप्रेसचे नेटवर्क आणखी वाढणार आहे. खरे तर, सध्या स्थितीला राज्यात एकूण ११ वंदे भारत एक्सप्रेस सुरू आहेत. राज्यातील सीएसएमटी ते सोलापूर, सीएसएमटी ते शिर्डी, सीएसएमटी ते जालना, सीएसएमटी ते मडगाव, मुंबई सेंट्रल ते गांधीनगर, मुंबई सेंट्रल ते अहमदाबाद, नागपूर ते सिकंदराबाद, नागपूर ते इंदोर, नागपूर ते बिलासपूर, पुणे ते कोल्हापूर आणि पुणे ते हुबळी या मार्गांवर ही गाडी सुरू आहे. दरम्यान



यापैकी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते जालना दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचा विस्तार नांदेड पर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेस प्रत्यक्षात रुळावर कधी धावणार ? याची प्रतीक्षा आता संपली आहे. भारतीय जनता पक्षाचे खासदार अशोक चव्हाण यांनी मुंबई नांदेड वंदे भारत एक्सप्रेस कधी धावणार याची तारीख सोशल मीडियावर जाहीर केली आहे.

**मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेस कधी धावणार?** खासदार अशोक चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट महिन्यात मुंबई नांदेड वंदे भारत एक्सप्रेस धावणार आहे. २६ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई नांदेड वंदे भारत एक्सप्रेस रुळावर धावेल अशी माहिती खासदार चव्हाण यांनी दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते जालना दरम्यान धावणारी वंदे भारत ट्रेन आता थेट नांदेड पर्यंत धावणार आहे यामुळे परभणी आणि नांदेड या मराठवाड्यातील दोन जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल अशी आशा आहे. मराठवाड्यातील परभणी आणि नांदेड हे दोन्ही जिल्हे आता वंदे भारत एक्सप्रेसच्या नकाशावर येणार आहेत.

**मुंबई -नांदेड वंदे भारत एक्सप्रेसचे वेळापत्रक कसे असणार?** रेल्वे कडून मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सकाळी पाच वाजता नांदेड रेल्वे स्थानकावरून सोडली जाणार आहे आणि दुपारी दोन वाजून २५ मिनिटांनी ही गाडी मुंबईला पोहोचणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ही गाडी दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी सोडली जाणार आहे आणि रात्री दहा वाजून पन्नास मिनिटांनी ही गाडी नांदेडला पोहोचणार आहे. मुंबई ते नांदेड यादरम्यानचा प्रवास वंदे भारत एक्सप्रेस मुळे अवघ्या साडेनऊ तासांमध्ये पूर्ण होणार आहे.

**ही ट्रेन कोण कोणत्या स्थानकावर थांबणार?** सीएसएमटी-नांदेड वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन या मार्गावरील दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, छत्रपती संभाजी नगर, जालना आणि परभणी या महत्त्वाच्या स्थानकावर थांबा घेणार आहे. दुसरीकडे, मीडिया रिपोर्ट मध्ये मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेसच्या एसी चेअर कारचे तिकीट सुमारे १७५० रुपये आणि एक्झिक्युटिव्ह एसी चेअर कारचे तिकीट ३३०० रुपयांपर्यंत राहील असा दावा करण्यात आला आहे. *****

(पान २ वरून....)

### मैं बीज हूँ.......

आणि फर्डे वक्तृत्व कौशल्य ही राजकारणात कायमच त्यांची जमेची बाजू राहिलेली आहे. त्यामुळे मुंडे यांचे मौन आता अल्पकालीन आहे, हे स्पष्ट आहे आणि त्याची प्रचिती सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दिसून आली. आजवर झालेले घात - आघात सहन करून त्यातून वाट काढत धनंजय मुंडे हे पुन्हा एकदा सुपारी देणाऱ्या आणि घेणाऱ्यांचे दात घशात घालून नवी उसळी घेणार आणि पूर्वीपेक्षा अधिक जोमाने, अधिक उत्साहाने राजकारणातील राजहंस बनण्याच्या मार्गावर मार्गक्रमण करणार हे निश्चित आहे.

मागील वर्षी एका भाषणात ते म्हणले होते,

*'' कई लोगों ने कोशिश की,*
*मुझे मिट्टी मे दबाने की,*
*मैं बीज हुं, आदत है मेरी,*
*बार बार उग जाने की! ''*

या काव्यपंक्ती प्रमाणे निश्चितच जितक्या वेळा धनंजय मुंडेंना दाबण्याचे, संपवण्याचे प्रयत्न होतील, तितक्याच ताकदीने ते पुन्हा उसळणार आणि एक लोकमान्य लोकनेतृत्व होण्याच्या दिशेने गतिमान वाटचाल करणार... हे नक्की आहे! सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शब्दरूपी शुभेच्छा! ***

# संचमान्यता व विद्यार्थ्यांचे लाभ देण्यासाठी ३० सप्टेंबर हाच निकष कायम ठेवावा-मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शाळांना संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांर्तगत मिळणारे लाभ देण्यासाठी ३० संप्टेंबर हाच निकष कायम ठेवावा त्यात बदल करू नये असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे शिक्षण आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आसल्याची माहिती शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अघाव यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की,आतापर्यंत शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत मिळणारे लाभ हे ३० संप्टेबरच्या पटसंख्येवर दिले जातात परंतु राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी २६ जून २०२५ रोजी शिक्षणाधिकारी यांच्या बैठकीत यावर्षी पासून शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत देण्यात येणारे लाभ देण्यासाठी ३० संप्टेबरच्या विद्यार्थी पटसंख्ये ऐवजी ३१ जुलैच्या पटसंख्येवर संचमान्यता व लाभ देण्याचे सुचित केले आहे.हा संदर्भ देऊन शिक्षणाधिकारी (मा.) बुलढाणा यांनी तसे आदेश त्यांच्या जिल्ह्यातील मुख्याध्यापकांना निर्गमित केले आहेत.तसेच आदेश राज्यातील शिक्षणाधिकारी आपआपल्या जिल्ह्यात निर्गमित करतील त्या अगोदरच आपण मराठवाडा शिक्षक संघाच्या या निवेदनाचा सखोल विचार करावा कारण पंधरा जूनला शाळा सुरू होतात. त्यानंतर एक ते दीड महिना विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरू राहते. त्यानंतर सर्व प्रवेशीत विद्यार्थ्यांची जनरल रजिस्टरला नोंद घेणे, विद्यार्थी प्रमोशन, युडायस, सरलला अपडेट करणे,आधार अपडेट करणे या सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेचा पट तयार होते. ही सर्व प्रक्रिया ३१ जुलै पर्यंत पुर्ण होणे शक्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. परिणामी शाळेची पटसंख्या आणि आधार अपडेट व सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेची ऑनलाईन पटसंख्या यात तफावत राहणार आहे. त्यामुळे पटसंख्या असूनही सर्व ऑनलाईन प्रकिया पुर्ण न झाल्यामुळे शिक्षक अतिरिक्त होण्याचा आणि विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शाळा व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे गंभीर प्रश्न निर्माण होणार आहेत. ते टाळण्यासाठी संचमान्यता व विविध उपक्रमांतर्गत लाभ पुर्वी प्रमाणेच ३० संप्टेबर च्या पटसंख्येवरच कायम ठेवावेत व निर्माण होणाऱ्या गंभीर समस्या व अप्रिय घटना टाळाव्यात असे दिलेल्या निवेदनात म्हटले असल्याचे अघाव यांनी कळविले आहे. ***

# विकासकामांचा गावनिहाय अहवाल तत्काळ सादर करा: गोरक्ष लोखंडे

बीड,(जिमाका):-दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेंतर्गतचे उद्दिष्ट, प्राप्त व खर्च झालेला निधी, पूर्ण झालेली कामे, प्रगती पथावर असलेल्या कामांचा गावनिहाय परिपूर्ण अहवाल राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगास तत्काळ सादर करावा, अशा सूचना राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी सबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचा आढावा जिल्हा परिषदेच्या बैठक सभागृहात श्री.लोखंडे यांनी घेतला. या बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा जात पडताळणी विभागाच्या सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी श्रावस्ती मेश्राम, संबंधित तालुक्यातील विस्तार अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. विविध योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. प्रलंबित कामांचा स्वयंस्पष्ट कारणांसह अहवाल सादर करावा, अशा सूचनाही श्री. लोखंडे यांनी अधिकाऱ्यांना बैठकीत केल्या. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.सोळंके यांनी कार्यान्वित विविध योजनांचा सविस्तर तपशील यावेळी सादर केला. ***